सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
वर्ष - ४ थे | अंक - १७९ वा | अमरावती (महाराष्ट्र) | शुक्रवार दि. २१ ऑगस्ट २०२६ | संपादक - डॉ. शुभांगी जोशी | मुल्य - १ रु. | पृष्ठ -४

## पेलेट गन वापरावरून राहुल गांधी पुन्हा आक्रमक
# दिल्लीतील पोलिस ठाण्याबाहेर ठिय्या आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१ नवी दिल्ली–** काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी विद्यार्थी प्रश्नावरून पुन्हा एकदा आक्रमक झाले आहेत. पेलेट गनचा मुद्दा उपस्थित करत राहुल गांधी यांनी आज दिल्लीतील पार्लमेंट स्ट्रीट पोलिस ठाण्याला भेट दिली आणि डीसीपी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन केले. जंतर मंतर येथे कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनादरम्यान वापरण्यात आलेल्या पेलेट गनबद्दल राहुल गांधी वारंवार प्रश्न उपस्थित करत आहेत. आज या प्रकरणाच्या तपासाची चौकशी करण्यासाठी त्यांनी डीसीपी कार्यालयाला भेट दिली. त्यानंतर एफआयआर दाखल करत नसल्यामुळे ते चांगलेच आक्रमक झाले. त्यांनी डीसीपी कार्यालयाबाहेर ठिय्या आंदोलन सुरू केले.

विद्यार्थी आंदोलनादरम्यान पोलिसांनी पेलेट गनचा वापर केला होता. या पेलेट गनमुळे अनेक विद्यार्थी जखमी झाले होते. या पेलेट गनमुळे जखमी झालेला विद्यार्थी साहिल लोचव याला घेऊन राहुल गांधी हे पोलिस ठाण्यात पोहचले. राहुल गांधी यांनी दिल्ली पोलिसांना या प्रकरणाच्या तपासाच्या प्रगतीबद्दल आणि त्यांनी आतापर्यंत काय कारवाई केली याबद्दल विचारणा केली. जोपर्यंत एफआयआर दाखल होत नाही, तोपर्यंत आपण घटनास्थळावरून जाणार नाही, असे सांगत राहुल गांधी यांनी डीसीपी कार्यालयाबाहेर ठिय्या आंदोलन सुरू केले.



या प्रकरणी एफआयआर दाखल होत नाही तोपर्यंत आपण इथेच थांबणार असल्याचे राहुल गांधी यांनी सांगितले. या प्रकरणाच्या तपासासाठी सुप्रीम कोर्टाने माजी न्यायमूर्ती आर. सुभाष रेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली ५ सदस्यीय उच्चस्तरीय चौकशी समिती स्थापन करण्यात आली आहे. ही समिती २० जुलै रोजी दिल्लीतील जंतर मंतर आणि देशाच्या इतर भागांमध्ये विद्यार्थी आंदोलकांवर झालेल्या पोलिस अत्याचारांच्या आरोपांची चौकशी करणार आहे. नीट पेपर फुटीसह आणि इतर परीक्षांच्या प्रश्नपत्रिका फुटल्यानंतर विद्यार्थी आक्रमक झाले होते आणि त्यांनी आंदोलन करत तत्कालीन शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती.दरम्यान, २० जुलै रोजी कॉक्रोच जनता पार्टीने दिल्लीतील जंतर मंतर येथे नीट पेपरफुटीच्या विरोधात आंदोलन केले होते. या आंदोलनामध्ये देशभरातील तरुण मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. दिल्ली पोलिसांनी आंदोलकांना पांगवण्यासाठी पेलेट गनचा वापर केला होता. यामध्ये अनेक विद्यार्थी जखमी झाले होते. त्यांच्यावर अद्याप रुग्णालयात उपचार सुरू आहे. विद्यार्थ्यांवर पेलेट गनच्या वापराबाबत विरोधी पक्ष आक्रमक झाला असून ते अजूनही प्रश्न उपस्थित करत आहे.

## CJP चे प्रवक्ते आशुतोष रांका यांना मारहाण
### दगडफेक करून पिटाळून लावले



**शाळा तपासणीस गेले होते; BJP कार्यकर्त्यांवर आरोप**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१ जयपूर–** राजस्थानमध्ये 'कॉकरोच जनता पार्टी'च्या (उगझ) शाळा भेटींना विरोध सुरू झाला आहे. शुक्रवारी सकाळी १० च्या सुमारास जयपूरमधील बगरू येथील रामपुरा कंवरपुरा येथील सरकारी प्राथमिक शाळेची पाहणी करण्यासाठी आलेले उगझ चे प्रवक्ते आशुतोष रांका व त्यांच्या सहकाऱ्यांना गावकऱ्यांनी मारहाण करून अक्षरशः पिटाळून लावले. त्यांच्यावर दगडफेकही करण्यात आली.

उगझ ने जयपूरमधील दोन सरकारी शाळांना भेट देण्याचे नियोजन केले होते. या नियोजनाचा भाग म्हणून, उगझ चे काही कार्यकर्ते सकाळी ८ वाजता रामपुरा कंवरपुरा येथे पोहोचले. इमारतीची दुरवस्था झाल्यामुळे तेथील शाळा बंद करण्यात आली होती. तेथील विद्यार्थ्यांना जवळच असलेल्या एका शेडमध्ये शिकवले जात होते.मिळालेल्या माहितीनुसार, स्थानिकांनी आधी उगझ कार्यकर्त्यांना बाहेर काढले. त्यानंतर त्यांनी सरकारी शाळेबाहेर निदर्शने केली, उगझ विरोधात घोषणाबाजी केली आणि ट्रॅक्टर-ट्रॉली आडवी लावून गावाचा मुख्य रस्ता रोखून धरला.गावकरी व भाजप कार्यकर्त्यांनी सांगितले, आम्ही ही शाळा स्वतःच्या हिमतीवर दुरुस्त करून घेऊ. सरकारने यासाठी आधीच १२.५० लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे. आम्ही कोणत्याही बाहेरच्या व्यक्तीला येथे येऊ देणार नाही. या 'कॉकरोचेस'ना (झुरळांना) येथे येऊन गोंधळ घालायचा आहे. हे आम्ही कोणत्याही परिस्थितीत खपवून घेणार नाही.दरम्यान, उगझ ने 'द' (ट्विटर) वर लिहिले, शाळांमध्ये सुधारणांची मागणी करत असताना आमच्या टीमवर हल्ला करण्यात आला. राजस्थान पोलीस अशा प्रकारची गुंडगिरी कशी काय होऊ देत आहेत? भाजपचे गुंड उघडपणे दादागिरी करत आहेत. राजस्थान पोलीस याकडे दुर्लक्ष करत आहेत. याचा परिणाम स्पष्ट आहे, राजस्थानमध्ये कायदा आणि सुव्यवस्था उरलेली नाही.

# राजेश बेठेकर मृत्यू प्रकरणी महर्षी स्कूल संचालका विरोधात गाडगे नगर पोलीस ठाण्यात तक्रार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**
महर्षी पब्लिक स्कूलमधील आदिवासी विद्यार्थी राजेश बेठेकर यांच्या मृत्यू प्रकरणाला आता नवे वळण मिळाले आहे. राजेशच्या कुटुंबीयांनी अमरावतीतील गाडगे नगर पोलीस ठाण्यात धाव घेत महर्षी पब्लिक स्कूलचे संचालक प्रशांत राठी यांच्या विरोधात तक्रार दाखल केली आहे.

राजेशच्या मृत्यूला शाळा प्रशासन जबाबदार असल्याचा आरोप करीत संचालकाविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी कुटुंबीयांनी केली आहे.

राजेश बेठेकर हा महर्षी पब्लिक स्कूलमध्ये शिक्षण घेत होता. त्याच्या प्रकृतीकडे शाळा प्रशासनाने वेळीच लक्ष दिले नाही. तसेच आवश्यक ती वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्यात हलगर्जीपणा करण्यात आल्याने राजेशचा मृत्यू झाल्याचा गंभीर आरोप त्याच्या नातेवाईकांनी केला आहे.



या प्रकरणात शाळा प्रशासनाच्या भूमिकेची सखोल चौकशी करण्यात यावी, राजेशच्या प्रकृतीबाबत शाळेकडून कोणती काळजी घेण्यात आली, त्याला वेळेत उपचार मिळाले का आणि संबंधितांकडून काही निष्काळजीपणा झाला का, याची चौकशी करण्याची मागणी कुटुंबीयांनी पोलिसांकडे केली आहे.दरम्यान, राजेशच्या मृत्यूमुळे कुटुंबीयांमध्ये संतापाचे वातावरण असून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. पोलिसांनी तक्रारीची दखल घेत प्रकरणाची चौकशी सुरू केली असून चौकशीतून नेमकी वस्तुस्थिती समोर येण्याची शक्यता आहे.या प्रकरणामुळे महर्षी पब्लिक स्कूल प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. राजेशच्या कुटुंबीयांनी न्याय मिळेपर्यंत पाठपुरावा करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

# आत्महत्या करणाऱ्या मुलाला वाचवताना आईवडिलांचाही मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१ छत्रपती संभाजीनगर :**
छत्रपती संभाजीनगरमधील एका घटनेने संपूर्ण महाराष्ट्र जेवढा हादरला आहे तेवढाच हळहळत आहे. एका १८ वर्षांच्या मुलाने आत्महत्या केली. त्याला वाचवण्याच्या प्रयत्नात आईवडिलांनाही जीव गमवावा लागला आहे. या धक्कादायक घटनेने छत्रपती संभाजीनगर हादरून गेला आहे. नक्की कोणतं कारण घडलं, मुलानं आत्महत्या करण्याइतके टोकाचं पाऊल का उचललं याची माहिती समोर आलेली नाही. मात्र, या घटनेनंतर तिसगाव परिसर शोकाकूल झाला आहे. सकाळी १० वाजल्यापासून दुपारी १ वाजेपर्यंत हे आत्महत्या नाट्य सुरू होते.




छत्रपती संभाजीनगर शहराला लागून तिसगाव हे गाव आहे. गावात खवड्या डोंगर आहे. या गावातील १८ वर्षांच्या मुलाचा वडिलांची क्षुल्लक वाद झाला. या वादानंतर मुलाने थेट आत्महत्येचा निर्णय घेतला आणि खवड्या डोंगरावर आला, अशी माहिती मिळत आहे. मुलाच्या पाठोपाठ त्याचे आईवडीलही गेले. मुलाची आई त्याला थांबवण्यासाठी डोंगरावर गेली तर वडिला डोंगराखाली होते. गावातील खूप लोक डोंगरावर आले होते. प्रत्येकजण खवड्या डोंगराच्या कड्यावर उभ्या असलेल्या मुलाला समजावण्याचा प्रयत्न करत होता. मात्र, मुलगा ऐकण्याच्या स्थितीत नव्हता. अखेर डोंगराखालून वडील कड्यावर आले. त्यांनी आत्महत्या करणाऱ्या मुलाजवळ जात त्याला थांबवण्याचा प्रयत्न केला. मात्र, दुर्दैवाने दोघेही कड्यावरून कोसळले.

हे दृष्य पाहून कड्यावर असलेली मुलाची आई आणि ग्रामस्थ हादरले. एवढ्या भयानक घटनेने सर्वांच्याच पायाखालची वाळू सरकली होती. अखेर हे दुःख सहन न झाल्यामुळे मुलाच्या आईनेही काहीही कळायच्या आत कड्यावरून उडी घेतली. त्यानंतर संपूर्ण परिसर सुन्न झाला. एक छोटासा वाद आणि मुलासह आईवडिलांचाही बळी गेल्यामुळे संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे तर छत्रपती संभाजीनगर जिल्हा हादरून गेला आहे. मुलगा कड्यावर आत्महत्येसाठी उभा असलेला व्हिडीओ व्हायरल झाल्यामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. यावेळी पोलीस आणि अग्निशमन दलाचे कर्मचारीही घटनास्थळी उपस्थित होते. या दुर्घटनेनंतर त्यांचे मृतदेह घाटी रुग्णालयात पोस्टमॉर्टेमसाठी नेण्यात आले.

# सहावीचे पुस्तक वादात: बालभारतीच्या ६ वीच्या इतिहासातून 'मांसाहार' आणि 'जातिव्यवस्था' गायब

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१मुंबई**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती आणि अभ्यासक्रम संशोधन मंडळाने (बालभारती) इयत्ता ६ वीच्या इतिहासाच्या नव्या रचनेत मोठे फेरबदल केले आहेत. वैदिक काळातील समाज केवळ 'वनस्पती-आधारित' आहार घेत होता आणि तो अत्यंत गुण्यागोविंदाने राहत होता, असा नवा दावा पुस्तकात करण्यात आला आहे.

मात्र, जुन्या पुस्तकातील संदर्भ बदलून इतिहास वस्तुस्थितीऐवजी 'धार्मिक दृष्टिकोनातून' मांडला जात असल्याचा आक्षेप तज्ज्ञांनी घेतल्याने पुण्यातील शैक्षणिक वर्तुळात यावर जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

बालभारतीने केलेल्या बदलांमुळे जुन्या आणि नवीन पुस्तकातील मांडणीत मोठी तफावत निर्माण झाली आहे आहारपद्धतीबाबत बालभारतीच्या सहावीच्या जुन्या पुस्तकात वैदिक काळातील



लोक अन्नात भाज्यांसोबतच मांसाहाराचाही वापर करत असल्याचा स्पष्ट उल्लेख होता, तर नवी पुस्तकात मात्र, वैदिक काळातील लोकांच्या आहारात केवळ धान्य, दूध, दही, तूप, मध आणि भाज्यांचा समावेश होता. त्यांचा आहार पूर्णपणे 'वनस्पती-आधारित' होता, असा दावा केला आहे. यासंबंधीचे वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे.

**जातिव्यवस्था आणि असमानता–** इंडियन एक्स्प्रेसने दिलेल्या वृत्तात म्हटले आहे की, 'जातिव्यवस्थेबाबत बालभारतीच्या सहावीच्या जुन्या पुस्तकात 'ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र हे चार वर्ण सुरुवातीला व्यवसायावर आधारित होते, पण नंतर ते जन्मावरून ठरवले जाऊ लागले. यातूनच जाती निर्माण झाल्या आणि समाजात असमानता आली,' असे स्पष्ट लिहिले होते. मात्र, नवीन पुस्तकात 'नव्या रचनेतून 'जातींमुळे समाजात असमानता आली' हा संदर्भच पूर्णपणे वगळला आहे. त्याऐवजी, 'लोक सहकार्य आणि आपुलकीने राहत होते आणि प्रत्येकाची समाजात विशिष्ट जबाबदारी होती,' अशी मांडणी करण्यात आली आहे.'

# मराठी न येणाऱ्या १,२६८ रिक्षा-टॅक्सी चालकांना नोटीस
## परिवहन विभागाची मोठी कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१मुंबई**
राज्यभरात रिक्षा आणि टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषेचे ज्ञान अनिवार्य करण्यात आल्यानंतर परिवहन विभागाने विशेष तपासणी मोहीम सुरू केली आहे. मोहिमेच्या पहिल्याच टप्प्यात मराठीचे पुरेसे ज्ञान नसलेल्या १,२६८ चालकांना नोटीस बजावण्यात आल्या आहेत.

मुंबई महानगर प्रदेशात वाहनचालकांना मराठी भाषेचे व्यवहार्य ज्ञान आहे की नाही, याची तपासणी करण्यात आली. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिलेल्या माहितीनुसार, मुंबई महानगर प्रदेशात आजपर्यंत ३,९९५ वाहनचालकांची तपासणी करण्यात आली. यापैकी ६०४ चालकांना व्यवहार्य मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान नसल्याचे आढळून आले. या



चालकांना नोटीस बजावण्यात आल्या आहेत.दरम्यान, राज्यातील इतर भागांत आतापर्यंत ४,२२२ वाहनचालकांची तपासणी करण्यात आली असून, त्यापैकी ६६४ चालकांना नोटिसा देण्यात आल्या आहेत. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात आतापर्यंत एकूण ८,२१७ वाहनचालकांची तपासणी करण्यात आली असून,१,२६८ चालकांना नोटीस बजावण्यात आल्या आहेत.परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मराठी न येणाऱ्या रिक्षाचालकांबाबत सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे.

## संपादकीय ......

# सेलिब्रिटींवरही कारवाई...

कोणत्याही सेवेचा किंवा उत्पादनासाठी दर्जा त्याच्या जाहिरातींच्या प्रभावीपणावरून ठरविण्याचा जमाना सुरू झाल्यावर ग्राहक नावाच्या राजाच्या मनाचा ताबा घेण्याच्या तंत्राचा शोध जाहिरातींच्या जगात सुरू झाला. मात्र त्यासाठी फारसे प्रयत्न करावे लागलेच नाहीत. जाहिरातींच्या विश्वाला ग्राहक राजा सहज भुलतो आणि जाहिरातीवरून आपल्या उपभोगाचा प्राधान्यक्रमही ठरवितो हे स्पष्ट होण्याआधीच, जाहिरातीच्या जगाने ग्राहकाच्या मनावर पुरता ताबा मिळविला होता. बाजारपेठेत ग्राहक हा राजा असतो असे म्हटले जात असले, तरी या राजाच्या मनावर जाहिरातींच्या जगाने केव्हाच राज्य सुरू केले आहे. या ग्राहकराजाला मांडलिक करून घेण्यासाठी उत्पादन आणि सेवाक्षेत्राने जाहिरातींच्या जगाची मदत घेतली. जाहिरातींच्या जगाचे बस्तान बसविण्यामध्ये माध्यमांचा मोठा वाटा असला, तरी, ग्राहकांवर काही माध्यमांनी प्रामाणिकपणाचे काही संकेतही पाळले होते. जाहिरातीतील मजकुराच्या सत्य-असत्याची शहानिशा करण्याची जबाबदारी ग्राहकावर असल्याचा इशारा देऊनच माध्यमांनी जाहिराती प्रसिद्ध केल्या, तर जाहिरातींच्या जगाला शरण जायचे की नाही याच्या निर्णयाची सारी जबाबदारी साहजिकच ग्राहकावर पडली. मात्र या गारुडाचा प्रभाव एवढा, की अनेकदा त्या जबाबदारीचे भान न राहिल्याने ग्राहकास कह्यात घेण्याचा सोपा मार्ग बाजारपेठांना सहज सापडून गेला. जाहिरातीच्या या जगात शब्दांचा प्रभाव कधी कधी उत्पादनाहूनही अधिक असतो. एखाद्या विशिष्ट 'ब्रॅण्ड'च्या नावाखाली तयार होणारे एखादे उत्पादन ग्राहकापर्यंत पोहोचविण्यासाठी एखादा लोकप्रिय चेहरा आणि लक्षात राहणारी, प्रभावी शब्दांची एखादी ओळ यांचे असे काही समीकरण जाहिरातींमध्ये तयार केले जाते, की उत्पादनाचे नाव न उच्चारताही त्याची ओळख ग्राहकांच्या मनात उमटते. 'जुबान केसरी' हे त्याचे ठळक उदाहरण म्हणावे लागेल.

वरवर पाहता, इलायची नावाच्या एका निरुपद्रवी उत्पादनाची ही जाहिरात असावी असे भासविले जात असले, तरी त्यामधून अप्रत्यक्षपणे पानमसाला किंवा तंबाखूजन्य उत्पादनाचा अप्रत्यक्ष प्रचार होण्याची शक्यता असल्याचे राज्याच्या अन्न व औषध प्रशासनाचे मत आहे. अर्थात, या कारवाईकडे केवळ तीन लोकप्रिय अभिनेत्यांना बजावलेल्या नोटीसेसची बातमी म्हणून पाहणे योग्य नाही. यामागे जाहिरात उद्योगाची एक अत्यंत चलाख पद्धत आणि त्याहून महत्त्वाचा सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न दडलेला आहे आणि जाहिरात विश्वाला शरण गेलेल्या समाजाच्या मानसिकतेचा गैरफायदा घेण्याचा व्यापारी डावदेखील स्पष्ट झाला आहे. मद्य किंवा तंबाखू आणि गुटख्याच्या उत्पादनविश्वाने या निर्बंधांनाच बगल देण्याची एक वेगळीच युक्ती शोधून ही उत्पादने ग्राहकांपर्यंत पोहोचविण्याचे वेगळे जाहिरात-तंत्र निर्माण केलेले पाहावयास मिळते. कंपन्यांनी त्याच ब्रॅण्डच्या नावाखाली दुसरे उत्पादन बाजारात आणायचे आणि त्या उत्पादनाची जाहिरात करायची, अशी पद्धत या तंत्राद्वारे विकसित झाली आहे.

संबंधित उत्पादनाच्या बाबतीत हेच तंत्र वापरले गेल्याची अन्न व औषध प्रशासनाची भूमिका असल्याने, याच ठिकाणी प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या कारवाईचे महत्त्व अधोरेखित होते. ग्राहकांमध्ये संभ्रम पसरविणाऱ्या आणि केवळ जाहिरातींच्या प्रभावामुळे ग्राहकांस जाळ्यात ओढून दुय्यम दर्जाची उत्पादने ग्राहकाच्या माथी मारणाऱ्या कोणत्याही उत्पादनाच्या भ्रामक जाहिरातींवर आणि त्यात सहभागी असलेल्या सेलिब्रिटींवरही कारवाई केली जाईल, अशी कठोर भूमिका अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्तपद स्वीकारल्यानंतर तुकाराम मुंढे यांनी मांडली होती.ऋ 'जुबान केसरी' नावाने माध्यमांद्वारे घराघरात पोहोचलेल्या जाहिरातीबाबत कदाचित प्रशासनाने याच भूमिकेचा आधार घेतला असावा. अर्थात, शाहरुख खान, अजय देवगण, टायगर श्रॉफ या कलाकारांना कारणे दाखवा नोटीस दिल्याने कारवाई पूर्ण होत नाही. कारण केवळ अशी नोटीस बजावली असली तरी आक्षेपांच्या मुद्दा संपलेला नाही आणि दोष सिद्ध झालेला नाही. संबंधित कलाकार, जाहिरातदार आणि हे उत्पादन बाजारात आणणाऱ्या कंपनीला आपली बाजू मांडण्याचा पूर्ण अधिकार आहे. प्रशासनाची कारवाई कितीही लोकप्रिय असली, तरी ती कायद्याच्या चौकटीत आणि योग्य प्रक्रियेतूनच पुढे गेली पाहिजे. अलिकडेच, प्रशासनाच्या काही कारवायांबाबत मुंबई उच्च न्यायालयानेही अधिकारांचा वापर संयमाने करण्याची गरज अधोरेखित केली आहे. त्यामुळे, मुंढे यांच्या कारवाईकडे एका टोकाने पाहण्याची गरज नाही. अभिनेते आहेत म्हणून त्यांच्यावर कारवाई केली का, हा प्रश्नही अपुरा आहे आणि मुंढे यांनी कारवाई केली म्हणजे ते नक्कीच दोषी आहेत असे मानणेही तितकेच चुकीचे आहे. या कारवाईच्या निमित्ताने पुन्हा एकदा चर्चेत आलेला एक मुद्दा महत्त्वाचा आहे. कोट्यवधी लोक ज्यांच्याकडे आदर्श म्हणून पाहतात, अशा कलाकारांनी एखाद्या उत्पादनाची जाहिरात स्वीकारताना त्यामागील व्यावसायिक युक्ती तपासावी, अशी सर्वसामान्यांची भावना असते. आपण केवळ इलायचीची जाहिरात केली, हा युक्तिवाद पळवाट म्हणून पुढे करता येईलही, पण त्यामुळे कलावंतांची सामाजिक जबाबदारी संपते का, हा प्रश्नदेखील महत्त्वाचा आहे. कारण, विशेषतः ज्या उत्पादनांचे व्यसन लागते, जी उत्पादने आरोग्यास अपायकारक आहेत आणि ज्यामुळे एखादी व्यक्ती व्यसनाधीन होऊन त्याचे वा त्याच्या परिवाराचे भविष्य उद्ध्वस्त होते, अशा उत्पादनांबाबत हा प्रश्न अधिक गंभीर होतो. तंबाखूमुळे होणारे आजार, कर्करोग, हृदयविकार आणि इतर आरोग्यविषयक धोके लक्षात घेतले तर या प्रकारच्या जाहिरातींचा प्रश्न केवळ ग्राहकाच्या खरेदीच्या स्वातंत्र्यापुरता मर्यादित राहत नाही. एखाद्या उत्पादनाविषयी ग्राहकाच्या मनात आकर्षण निर्माण करण्यासाठी प्रसिद्ध अभिनेत्याचा चेहरा वापरला जात असेल, तर त्याच्या सामाजिक परिणामांकडे होणाऱ्या दुर्लक्षाची मोठी किंमत मोजावी लागते.

# सब गोलमाल हैं भाई .... सब गोलमाल हैं

# नोंद १४ तारखेत, विद्यार्थी गेले १६ ऑगस्टला

## रेकॉर्डमध्ये तफावत : महर्षी पब्लिक स्कूलची मेस विनापरवानगी सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती**

शहरातील आदिवासी विद्यार्थी शिकत असलेल्या महर्षी पब्लिक स्कूलमधील जे दोन विद्यार्थी रजा घेऊन गेले, त्यासंदर्भात येथे असलेल्या नोंदीत प्रचंड तफावत आढळून आली. विद्यार्थी १६ ऑगस्टला गेले असताना, रजिस्टरमध्ये प्रत्यक्षात १४ ऑगस्टची नोंद घेतल्याचे दिसून येते. आदिवासी विकास विभागाने यासंदर्भात शाळा प्रशासनाला भेट देऊन चौकशी सुरू केली असता, अशी अनियमितता आढळून आली आहे. महर्षी पब्लिक स्कूलच्या नामांकित आश्रमशाळेत शिकणारे चिखलदरा तालुक्यातील दोन विद्यार्थी रजा घेऊन गेले. विद्यार्थ्यांच्या पालकांनी त्यांना १६ ऑगस्टला येथे येऊन घेऊन गेल्याची बाब सुरवातील पुढे आली होती. परंतु रजिस्टरमध्ये नोंद मात्र १४ तारखेला घेतल्या गेल्याचे दिसून येते. आपल्या भावाला घेण्याकरिता जो युवक महर्षी पब्लिक स्कूलमध्ये आला होता, त्याचे बयाण अधिकाऱ्यांनी नोंदविले. त्याने भावाला येथून १६ ऑगस्टला नेल्याचे सांगितले आहे, असे असताना नोंद १४ ऑगस्टची कशी? अशी अनियमितता आढळून आल्याचे अपर आयुक्त संदीप गोलाईत यांनी सांगितले. महर्षी पब्लिक स्कूलच्या वसतिगृहाची मेस चालू करण्यासाठी शाळा प्रशासनाने अन्न व औषध प्रशासनाची परवानगी घेतलेली नाही. त्यामुळे एफडीएच्या पथकाने तपासणी करून मेस सील केली आहे, असे या विभागाचे सहआयुक्त विनय चव्हाण यांनी सांगितले. त्यामुळे शाळा प्रशासनाला पर्यायी व्यवस्था काही दिवस करावी लागणार असल्याचे दिसून येते.




> उपस्थित घटनाक्रमानंतर महर्षी पब्लिक स्कूलच्या शाळा प्रशासनाकडून तातडीने त्यांचे मत सादर करावे, असे नोटीस बजावून सांगण्यात आलेले आहे. शुक्रवार २१ ऑगस्टपर्यंत त्यांचे मत सादर करण्याचे आदेश दिले.
>
> **-संदीप गोलाईत,** अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, अमरावती.-

### मुलाची प्रकृती १५ ला बिघडली?

रजा घेऊन गावी गेलेल्या एका मुलाची प्रकृती १५ ऑगस्टला बिघडली होती. त्याला उलट्या झाल्या होत्या, असे येथील काही विद्यार्थ्यांनी अधिकाऱ्यांना बयाणात सांगितले आहे. परंतु त्याचवेळी शाळा प्रशासनाने त्याची चौकशी का केली नाही, असा प्रश्न उपस्थित केल्या जात आहे. सीसीटीव्ही आहेत, परंतु स्टोअरेज नाही महर्षी पब्लिक स्कूल, या नामांकित आश्रमशाळेत सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. त्यापैकी बरेच कॅमेरे सुरू आहेत, परंतु त्याचे नियमित फुटेज स्टोअर केलेले दिसत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना घेऊन जाण्यासाठी त्यांचे पालक १४ ला आले होते की १६ ऑगस्टला हेसुद्धा निश्चित करता आलेले नाही.

# आ. यावलकरांच्या पुढाकाराने दीक्षित वानखडे यांचे बेमुदत उपोषण मागे

## सरपंच लीला कुमरे यांच्या स्वाक्षरीने शिपाई पदाचा अस्थायी आदेश

## सोलव, मुरूमकर यांच्या मध्यस्थीने आंदोलनाचीं सांगता

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१वरूड** जामगाव खडका ग्रामपंचायतीच्या शिपाई पदावर नियुक्ती मिळावी, या मागणीसाठी बेमुदत उपोषणाला बसलेले दीक्षित वानखडे यांनी अखेर आपले आंदोलन मागे घेतले. आ. चंदू यावलकर, श्रीधर उर्फ बाळासाहेब सोलव आणि बालू मुरूमकर यांच्या पुढाकाराने वानखडे यांच्या मागणीवर तात्पुरता तोडगा काढण्यात आला. ग्रामपंचायतीच्या सरपंच लीला कुमरे यांच्या स्वाक्षरीने वानखडे यांना शिपाई पदाचा अस्थायी स्वरूपातील लेखी आदेश देण्यात आल्यानंतर उपोषणाची सांगता झाली.

जामगाव खडका ग्रामपंचायतीतील शिपाई पदाच्या नियुक्तीवरून गेल्या काही दिवसांपासून वाद निर्माण झाला होता. नियुक्तीच्या मागणीसाठी दीक्षित वानखडे यांनी बेमुदत उपोषण सुरू केल्याने ग्राम पंचायत प्रशासनासह स्थानिक पातळीवरही या प्रकरणाकडे लक्ष वेधले गेले होते. दरम्यान, आमदार चंदू यावलकर यांनी संबंधितांशी चर्चा करून या प्रकरणात पुढाकार घेतला. श्रीधर उर्फ बाळासाहेब सोलव आणि बालू मुरूमकर यांनीही मध्यस्थी करत तोडगा काढण्यासाठी प्रयत्न केले. चर्चेनंतर सरपंच लीला कुमरे यांच्या स्वाक्षरीने अस्थायी लेखी आदेश देण्यात आला. त्यानंतर दीक्षित वानखडे यांनी उपोषण मागे घेतले.अस्थायी नियुक्तीमुळे वानखडे यांच्या मागणीला तात्पुरता दिलासा मिळाला असला, तरी शिपाई पदभरतीची पुढील प्रशासकीय व कायदेशीर प्रक्रिया काय होते? याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.



# २७ ऑगस्टपासून डॉ.अर्जुन महानर यांचा बेमुदत आंदोलनाचा इशारा

## पालकमंत्र्यांच्या आश्वासनानंतरही शासन निर्णय नाही

## मेंढपाळ बांधवांच्या विविध न्याय्य मागण्या प्रलंबित

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती**

मेंढपाळ बांधवांच्या विविध न्याय्य मागण्यांसाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ. अर्जुन महानर यांच्या नेतृत्वाखाली अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयावर अन्नत्याग आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनाची शासनाने दखल घेत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसेच संबंधित मंत्र्यांनी बैठका घेऊन सकारात्मक आश्वासन दिले होते. मात्र, अद्याप शासन निर्णय जारी न झाल्याने मेंढपाळ समाजात नाराजी आहे. वारंवार आंदोलने, बैठका व आश्वासने होऊनही प्रश्न प्रलंबित राहिल्याने २७ ऑगस्टपासून डॉ. अर्जुन महानर यांच्या नेतृत्वाखाली बेमुदत अन्नत्याग आंदोलन करण्याचा इशारा मेंढपाळ बांधवांच्या बैठकित देण्यात आला आहे.

वनक्षेत्रात पारंपरिक पद्धतीने मेंढ्या-शेळ्या चारण्यासाठी जाणाऱ्या मेंढपाळांना विनाकारण अडवू नये, वन विभागाकडून दाखल करण्यात आलेल्या गुन्हे व दंड प्रकरणांचा पुनर्विचार करावा, नुकसानभरपाईची मर्यादा वाढवून १०० मेंढ्यांपर्यंत करावी, पारंपरिक व्यवसायाचे संरक्षण करावे, स्वतंत्र विकास महामंडळ स्थापन करून निधी उपलब्ध करावा, तसेच शेळ्या मेंढ्यांसाठी मोफत लसीकरण वतपासणी शिबिरे आयोजित क अशा प्रमुख मागण्या आहेत. बैठकीत आश्वासनदुसऱ्याच दिवशी वन विभागान बांधवांवर आणि मेंढ्यांवर केली. एकीकडे आश्वासन दुसरीकडे कारवाई हा अन्या अशी प्रतिक्रिया डॉ. अर्जुन यांनी दिली.



# राज्य महोत्सव गणेशोत्सवाच्या स्पर्धेत अधिकाधिक गणेश मंडळांनी सहभाग घ्यावा

## विभागीय आयुक्त नयना गुंडे यांचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती**

महाराष्ट्र शासनाने राज्यातील सार्वजनिक गणेशोत्सव हा 'राज्य महोत्सव' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला असून, या अंतर्गत 'उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा' आता तालुका, जिल्हा, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर आयोजित करण्यात येणार आहे. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने १७ ऑगस्ट २०२६ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार या भव्य स्पर्धेची घोषणा करण्यात आली आहे. अमरावती विभागातील जास्तीत जास्त गणेशोत्सव मंडळांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी केले आहे. स्पर्धेची माहिती पुढील प्रमाणे आहे या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुक आणि पात्र मंडळांनी पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेल्या सरपशीर्हीर्रीं.श्रिवाझर.ले.ळप या पोर्टलद्वारे विहित वेळेत दि. ७ सप्टेंबर २०२६ पर्यंत आपला अर्ज ऑनलाईन सादर करावयाचा आहे. स्पर्धेसाठी पात्रता व अटी पुढील प्रमाणे आहेत या स्पर्धेत केवळ संबंधित यंत्रणेद्वारे नोंदणीकृत संस्था अथवा परवानाधारक गणेशोत्सव मंडळेच सहभागी होऊ शकतात. नवीन मंडळांना संधी देण्याच्या उद्देशाने, चालू आर्थिक वर्षाच्या मागील सलग दोन वर्षे राज्यस्तरीय किंवा जिल्हास्तरीय पारितोषिके प्राप्त झालेली सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे यावर्षीच्या पारितोषिकास पात्र ठरणार नाहीत. (सदरची अट राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय गणेशोत्सव मंडळांनाही लागू राहील). या स्पर्धेसाठी मंडळांनी केलेल्या कामाचा कालावधी मागील वर्षाच्या अनंत चतुर्दशीपासून चालू वर्षाच्या अनंत चतुर्दशीपर्यंत ग्राह्य धरण्यात येईल.विविध स्तरांवरील विजेत्या मंडळांना खालीलप्रमाणे भरघोस रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात येणार आहे. तालुका स्तर: प्रथम क्रमांक - २५ हजार रुपये, जिल्हा स्तर: प्रथम क्रमांक -५० हजार रुपये, द्वितीय क्रमांक - ४० हजार रुपये, तृतीय क्रमांक - ३० हजार रुपये, राज्य स्तर: प्रथम क्रमांक - ७ लाख ५० हजार रुपये, द्वितीय क्रमांक - ५ लाख रुपये, तृतीय क्रमांक- २ लाख ५० हजार रुपये राष्ट्रीय स्तर: प्रथम क्रमांक - ७ लाख ५० हजार रुपये द्वितीय क्रमांक- ५ लाख रुपये, तृतीय क्रमांक-२ लाख ५० हजार रुपये आंतरराष्ट्रीय स्तर: प्रथम क्रमांक- ७ लाख ५० हजार रुपये, द्वितीय क्रमांक- ५ लाख रुपये, तृतीय क्रमांक- २ लाख ५० हजार रुपये याव्यतिरिक्त, राज्यस्तरीय निवड समितीकडे आलेल्या ३६ जिल्हास्तरीय प्रथम विजेत्या मंडळांपैकी, राज्यस्तरावरील पहिले ३ विजेते वगळून उर्वरित ३३ मंडळांना राज्य शासनाकडून प्रत्येकी ५० हजार रुपये चे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येईल.उत्कृष्ट मंडळांची निवड करताना कलांचे जतन व संवर्धन, संस्कृतीचे जतन, निसर्गाचे व सार्वजनिक संपत्तीचे संवर्धन, सामाजिक कार्य आणि गणेशोत्सव आयोजनातील विधायकता (उदा. पर्यावरणपूरक मूर्ती, सजावट, महिलांचा ३० टक्के सहभाग इत्यादी) या १०० गुणांच्या निकषांवर परीक्षण केले जाईल.स्पर्धेचे सविस्तर निकष, आवश्यक कागदपत्रे आणि अर्जाच्या प्रक्रियेबाबत अधिक माहिती जाणून घेण्यासाठी सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी १७ ऑगस्ट २०२६ रोजीच्या शासन निर्णयाचे सविस्तर अवलोकन करावे तसेच पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या अधिकृत संकेतस्थळाला ganeshostav.pldmka.co.in आवर्जून भेट द्यावी. अधिक माहितीसाठी शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे. तरी समाजाभिमुख आणि पर्यावरणपूरक उत्सव साजरा करणाऱ्या अमरावती विभागातील सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी या स्पर्धेत उत्स्फूर्तपणे आणि मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन विभागीय आयुक्त, नयना गुंडे, यांनी केले आहे.




# ठसा न उमटणाऱ्या शेतकऱ्यांची चिंता मिटली

## कर्जमाफीसाठी स्वतंत्र प्रक्रिया वयस्कर व बोटांचे ठसे न उमटणाऱ्या शेतकऱ्यांसाठी दिलासा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना अंतर्गत वयस्कर तसेच बोटांच्या ठशांची नोंद होऊ न शकणाऱ्या शेतकऱ्यांना आधार प्रमाणीकरण करताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी स्वतंत्र कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. पोर्टलवरील 'प्रमाणीकरण शक्य नाही' हा पर्याय शेतकऱ्यांनी निवडावा. शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना सहकार आयुक्त तथा सहकारी संस्था निबंधक दिपक तावरे यांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांसह जिल्हा उपनिबंधकांना दिल्या आहेत. या

योजनेतील लाभार्थी शेतकऱ्यांनी यादीतील विशिष्ट क्रमांकासह जवळच्या आपले सरकार नेवा केंद्रात आधार कार्ड आणि बँक पासबुक बऊन जावे. यादीतील विशिष्ट क्रमांक अथवा माधार क्रमांकाच्या माध्यमातून पोर्टलवर संबंधित तकऱ्याच्या कर्जाची माहिती पाहता येणार हे. ही माहिती मान्य अथवा अमान्य सल्याची नोंद केल्यानंतर बोटांच्या ठशांद्वारे

आधार प्रमाणीकरण करण्यात येईल. एका बोटाचा ठसा उमटत नसल्यास संबंधित शेतकऱ्याच्या वेगवेगळ्या बोटांद्वारे किमान तीन वेळा प्रमाणीकरणाचा प्रयत्न करावा लागणार आहे. त्यानंतरही प्रमाणीकरण न झाल्यास सेवा केंद्र चालकाने पोर्टलवरील 'प्रमाणीकरण शक्य नाही' हा पर्याय निवडावा.त्यानंतर सेवा केंद्र चालक स्वतःच्या बोटाच्या ठशाद्वारे आधार प्रमाणीकरणाची पुढील प्रक्रिया पूर्ण करेल. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संबंधित तक्रार ऑनलाईन पद्धतीने तहसीलदारांकडे पाठविण्यात येणार आहे. यानंतर संबंधित शेतकऱ्याने तहसील कार्यालयात आधार कार्ड, बँक पासबुक, सातबारा उतारा तसेच स्वतःची ओळख निश्चित करणारी आवश्यक कागदपत्रे सादर करावीत. तालुकास्तरीय समितीमार्फत या कागदपत्रांची पडताळणी करून संबंधित व्यक्तीची ओळख निश्चित करण्यात येईल. व्यक्तीचा आधार क्रमांक योग्य असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर समितीमार्फत तक्रार मान्य करून आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे.



आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# पाईपलाईनच्या खोदकामात शेकडो वृक्षांना धोका

## झाडांच्या मुळ्या उघड्या पडल्याने संताप

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२१लेहगाव** अमरावती शहराला वाढीव पाणीपुरवठा करण्यासाठी लेहगाव-मोर्शी-सिंभोरा धरण मार्गावर पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू आहे. इंद्रजीत इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेडच्या माध्यमातून सुरू असलेल्या या कामादरम्यान रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या सामाजिक वनीकरण विभागाच्या झाडांच्या मुळ्या पोकलँड मशीनच्या सहाय्याने उघड्या पाडण्यात आल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. काही झाडे तोडण्यात आल्याने पर्यावरणप्रेमी आणि स्थानिक नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.अमरावती-पाढर्णा राज्य महामार्गाचे सिमेंट कॉंक्रिटचे काम सुमारे पाच ते सहा वर्षांपूर्वी पूर्ण झाले. त्यावेळी रस्त्याच्या दोन्ही बाजूंना सामाजिक वनीकरणाच्या माध्यमातून कडुनिंबासह विविध वृक्षांची लागवड करण्यात आली होती. गेल्या काही वर्षांत ही झाडे चांगली वाढली असून रस्त्याला हिरवाईचे स्वरूप प्राप्त झाले होते. मात्र, पाईपलाईनसाठी खोदकाम करताना अनेक झाडांच्या मुळ्या उघड्या पडल्याने त्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे.काही ठिकाणी पोकलँड मशीनच्या सहाय्याने झाडांना नुकसान पोहोचवून लगेचच खोदलेला भाग मातीने बुजविण्यात येत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. शासनाकडून वृक्षलागवड आणि वृक्षसंवर्धनासाठी मोठ्या




प्रमाणात निधी खर्च केला जात असताना दुसरीकडे विकासकामांच्या नावाखाली संगोपन केलेल्या वृक्षांचे नुकसान होत असल्याने नागरिकांनी प्रश्न उपस्थित केला आहे.वृक्षांनी नटलेला हा राज्य मार्ग भविष्यात भकास होण्याची भीती व्यक्त केली जात असून, प्रवाशांना उन्हापासून विसावा मिळण्यासाठी असलेली हिरवाई नष्ट होणार असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. संबंधित विभागाची परवानगी घेऊनच झाडांबाबत कार्यवाही करण्यात आली आहे का, याचीही चौकशी करण्याची मागणी होत आहे.लेहगाव ते शिरखेड, निंभी मार्गावर वाढीव पाणीपुरवठ्यासाठी पाईपलाईनचे काम सुरू असले तरी विकासकाम करताना पर्यावरणाची हानी होऊ नये, याची दक्षता घेणे आवश्यक आहे. संबंधित विभागाने तातडीने पाहणी करून झाडांच्या नुकसानीची चौकशी करावी, अनधिकृतपणे झाडे तोडली असल्यास संबंधित कंत्राटदारावर कायदेशीर कारवाई करावी आणि नुकसान झालेल्या वृक्षांचे पुनर्रोपण करावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.



## लक्ष मेळघाट....

सौ.आरती राजेश वानखडे गुरुवारी मेळघाट दौऱ्यावर असताना मेळघाटचे लोकप्रिय व कर्तव्यदक्ष आमदार केवलरामजी काळे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेण्याचा आनंद लाभला.यावेळी विविध सामाजिक व विकासात्मक विषयांवर मनमोकळा संवाद साधला. त्यांचे आपुलकीचे प्रेम, आत्मीय स्वागत आणि नेहमीच मिळणारे मार्गदर्शन मनाला ऊर्जा देणारे आहे.तसेच नवविवाहित उत्कर्षा काळे व युवराज काळे यांची भेट घेऊन त्यांच्या नव्या वैवाहिक जीवनासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्यात.

# जिल्ह्यासह राज्यात कृषी विस्ताराला वेग

## शेतकरी मित्रांची मानधन तत्त्वावर दोन वर्षांसाठी नियुक्ती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१अमरावती**

जिल्ह्यासह राज्यात नवीन संशोधन, आधुनिक तंत्रज्ञान आणि सुधारित शेती पद्धती थेट शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचविण्यासाठी कृषी विभागाने राज्यभरात ११ हजार ५८७शेतकरी मित्र नेमण्याचा निर्णय घेतला आहे. अमरावती जिल्ह्यासह राज्यात कृषी विस्ताराच्या कामाला यामुळे गती मिळणार आहे.

आत्मा यंत्रणेच्या निधीतून शेतकरी मि त्रांना दरमहा १ हजार ५०० रुपये, म्हणजे वर्षाला १८ हजार रुपये मानधन दिले जाणार आहे. ही रक्कम दर तीन महिन्यांनी एकत्रितपणे दिली जाईल. मात्र, प्रवास खर्च किंवा इतर कोणतेही



भत्ते मिळणार नाहीत. शेतकरी मित्रांच्या कामाचे दरवर्षी मूल्यांकन होणार असून, तांत्रिक बाबींसाठी १०० आणि उल्लेखनीय कामांसाठी २५ असे एकूण १२५ गुण ठेवण्यात आले आहेत. शेतीशाळेतील उपस्थिती, सर्वेक्षण आणि ग्रामसभेतील सहभाग आदी निकषांवर मूल्यांकन केले जाईल.

नियुक्तीसाठी उमेदवार संबंधित गावाच्या कार्यक्षेत्रातील रहिवासी व शेतकरी असणे बंधनकारक आहे. किमान ३० टक्के महिलांची निवड करण्यात येणार असून, २५ ते ६०वर्षे वयोगटातील किमान बारावी उत्तीर्ण आणि शेतकरी संघटन कौशल्य असलेल्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल. पहिल्या टप्प्यात ही नियुक्ती दोन वर्षांसाठी राहणार आहे. ग्राम कृषी विकास समितीच्या ठरावानंतर पारदर्शक पद्धतीने निवड केली जाईल. मात्र, या नियुक्त्या कायमस्वरूपी नसतील. दर तीन महिन्यांनी कामाचा आढावा घेऊन अहवालाच्या आधारे मानधन दिले जाणार आहे.

**शेतकरी मित्राची कामे**

कृषी योजनांचा प्रचार, शेतकरी गटांची बांधणी, शेतीशाळांसाठी शेतकऱ्यांची निवड, नैसर्गिक शेतीचा प्रसार, विविध कृषी मोहिमांमध्ये सहभाग आणि शेतकरी सुविधा केंद्रांच्या स्थापनेसाठी सहकार्य करणे हे राहणार आहे.

### महर्षी पब्लिक स्कूलमधील अन्नातून विषबाधा प्रकरण

# शाळेच्या भोंगळ कारभारामुळेच निष्पाप विद्यार्थ्यांवर हा प्रसंग ओढवला

## भाजप प्रवक्ते शिवराय कुळकर्णी यांची शाळा प्रशासनावर कारवाईची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१अमरावती–** अमरावती येथील महर्षी पब्लिक स्कूलमध्ये अन्नातून विषबाधा झाल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे. या विषबाधेमुळे एका आदिवासी विद्यार्थ्याचा नाहक बळी गेला असून, इतर सात विद्यार्थ्यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या गंभीर घटनेमुळे शालेय व्यवस्थापनाचा निष्काळजीपणा आणि भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला आहे. शाळेच्या भोंगळ कारभारामुळेच निष्पाप विद्यार्थ्यांवर हा प्रसंग ओढवला असल्याचा आरोप करीत भाजप प्रवक्ते शिवराय कुलकर्णी यांनी शाळा प्रशासनावर कडक कारवाईची मागणी केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शाळेत विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या निकृष्ट दर्जाच्या जेवणामुळे ही विषबाधा झाल्याचा आरोप केला जात आहे.वेळेत योग्य वैद्यकीय मदत न मिळाल्यास आणखी मोठी दुर्घटना घडली असती, अशी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे.या घटनेची गंभीर दखल घेत भाजपचे प्रवक्ते शिवराय कुलकर्णी यांनी शालेय व्यवस्थापनावर तीव्र शब्दांत हल्लाबोल केला आहे. शाळेच्या भोंगळ कारभारामुळेच निष्पाप विद्यार्थ्यांवर हा प्रसंग ओढवला



आहे. आदिवासी विद्यार्थ्यांच्या नावावर अनुदान लाटून त्यांच्या जीवाशी खेळ खेळला जात आहे. हा शालेय भ्रष्टाचाराचा एक बोलका नमुना आहे, असा घणाघाती आरोप त्यांनी केला. तसेच या संपूर्ण प्रकाराची कसून चौकशी करण्यात यावी आणि दोषींवर लवकरात लवकर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी ठाम मागणीही त्यांनी केली आहे. दोषींवर कारवाई न झाल्यास हे व्यवस्थापन पुढेही विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळत राहील,असेही ते म्हणालेत.

# चिखलदऱ्याच्या सक्कर तलावात अखेर वॉटर बोटिंग सुरू

### पर्यटकांमध्ये आनंदाचे वातावरण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१चिखलदरा**

विदर्भाचे नंदनवन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चिखलदऱ्यच्या प्रसिद्ध सक्कर तलावामध्ये अखेर वॉटर बोटिंग सेवा पुन्हा सुरू करण्यात आली आहे. तलावाची पाणीपातळी कमी झाल्यामुळे गेल्या काही दिवसांपासून वॉटर बोटिंग बंद ठेवण्यात आले होते. मात्र, चिखलदऱ्यात समाधानकारक पाऊस झाल्याने तलावाची पाणीपातळी वाढली असून वॉटर बोटिंगला पुन्हा सुरुवात झाली आहे.चिखलदऱ्यात सध्या



निसर्गसौंदर्याचा आनंद घेण्या साठी पर्यटकांची मोठी गर्दी होत आहे. त्यातच सक्कर तलावातील वॉटर बोटिंग पुन्हा सुरू झाल्याने पर्यटकांच्या आनंदात आणखी भर पडली आहे.पावसाअभावी सक्कर तलावाची पाणीपातळी कमी झाली होती. त्यामुळे पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने वॉटर बोटिंग सेवा तात्पुरती बंद करण्यात आली होती. मागील काही दिवसांत झालेल्या समाधानकारक पावसामुळे तलावाची पाणीपातळी वाढली आणि बोटिंगसाठी परिस्थिती अनुकूल झाल्यानंतर प्रशासनाकडून वॉटर बोटिंगला हिरवा कंदील देण्यात आला.

# तांडा वस्तीच्या निविदा रखडल्या

## निविदा 'मॅनेज' होत नसल्याने प्रक्रिया लांबविल्याचा आरोप, कंत्राटदारांचा आंदोलनाचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१शिवणी रसुलापूर –** पंचायत समिती नांदगाव खंडेश्वर अंतर्गत तांडा वस्ती विकास योजनेतील सुमारे ३३ लाख रुपयांच्या विकासकामांची निविदाप्रक्रिया १५ दिवसांपासून गटविकास अधिकारी कार्यालयात रखडली आहे. निविदा सादर करूनही ती अद्याप उघडण्यात आली नसल्याने या प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

गटविकास अधिकारी, पंचायत समिती नांदगाव खंडेश्वर यांच्यामार्फत तांडा वस्ती विकास योजनेंतर्गत विविध कामांसाठी ३३ लाख रुपयांची निविदा काढण्यात आली होती. निविदा



सादर करण्याची प्रक्रिया पूर्ण होऊन १५ दिवसांचा कालावधी उलटला, तरी निविदा उघडण्यात आलेली नाही. त्यामुळे कंत्राटदारांमध्ये नाराजी असून प्रशासनाच्या भूमिकेबाबत संशय व्यक्त केला जात आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, या निविदाप्रक्रियेत कंत्राटदारांमध्ये स्पर्धा झाल्याने काम कमी दराने जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे निविदा 'मॅनेज' करण्याचा प्रयत्न होत असल्याची चर्चा कंत्राटदारांमध्ये आहे. मात्र, या आरोपांना अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. निविदा वेळेत न उघडल्याने प्रक्रियेवर संशय निर्माण झाला असून, यामध्ये आर्थिक गैरप्रकार होण्याची शक्यता असल्याचा आरोप कंत्राटदारांकडून करण्यात येत आहे. सुशिक्षित बेरोजगार कंत्राटदार कमी दराने काम करण्यास तयार असतानाही निविदा प्रक्रिया रखडवून त्यांना संधी नाकारली जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. याप्रकरणी जिल्हा परिषदेतील काही कंत्राटदारांनी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची भेट घेऊन लेखी तक्रार दिली आहे. निविदा प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याची मागणी करीत शासकीय कंत्राटदारांनी प्रशासनाला आंदोलनाचा इशारा दिला आहे. येत्या दोन दिवसांत निविदा उघडण्यात आल्या नाहीत, तर गटविकास अधिकारी यांच्या दालनासमोर ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. प्रशासनाने याप्रकरणाची तातडीने चौकशी करून निविदाप्रक्रिया नियमानुसार व पारदर्शकपणे पूर्ण करावी, अशी मागणी कंत्राटदारांसह नागरिकांकडून होत आहे.

> तांडा वस्तीच्या कामाची निविदाप्रक्रिया काढण्याची सर्व प्रक्रिया पूर्ण झाली आहे. काही तांत्रिक बाबी आहेत, त्या पूर्ण झाल्यास लवकरच निविदा उघडण्यात येईल.
>
> **–विनोद कांबळे,** विस्तार अधिकारी, पंचायत समिती, नांदगाव.

# आ.तायडे यांच्या हस्ते घाटलाडकी येथील प्राथमिक आरोग्यकेंद्राचे लोकार्पण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१ घाटलाडकी** घाटलाडकी येथील बहुप्रतीक्षित प्राथमिक आरोग्यकेंद्राचे लोकार्पण स्वातंत्र्यदिनी ऑनलाइन पद्धतीने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर तसेच आरोग्य राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार प्रवीण तायडे होते. यावेळी बियाणे महामंडळाचे अध्यक्ष प्रमोद कोरडे, भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य अशोक बनसोड, घाटलाडकीच्या सरपंच शिवानंद मदने, उपसरपंच अब्दुल हफीज, शिरसगाव मंडळ तालुका अध्यक्ष हर्षद धुळे, महिला आघाडीच्या तालुका अध्यक्ष जयश्री पंडागळे, भाजप तालुका अध्यक्ष रमेश तायवाडे, मुरली माकोडे, कुंदन यादव, रूपेश ढेपे, जिल्हा आरोग्य अधिकारी पारिसे, जि. प. अभियंता नितीन झगडे, तालुका आरोग्य अधिकारी उज्ज्वला डकरे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. यावेळी अशोक



फुकट, मनोहरसिंग पवार, सुरेश खाजोने, किसन भुजाडे, अरुण मुंदडा, दुर्गेश पुरोहित, जितेंद्रसिंह पवार, पंकज वरठी, यशवंत तायवाडे, जानराव डोमाळे, अभिषेक पोहरे, युवा संघर्ष समितीचे सागर कपले, दीक्षित खाजोने, चंद्रशेखर खाडगळे, सागर शिरभाते, सुनील कपले, कैलास धुर्वे, अनिल तायडे, अक्षय कपले, अभिजित तायडे, मंगेश तायडे, अंकुश बिरे, मयूर खाडगडे, प्रीतेश फुकट तसेच आरोग्य विभागातील डॉक्टर व कर्मचारी आणि घाटलाडकी गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> १० ते १५ गावांना मिळणार लाभ
>
> घाटलाडकी येथे प्राथमिक आरोग्यकेंद्र सुरू झाल्यामुळे घाटलाडकीसह परिसरातील सुमारे १० ते १५ गावांतील नागरिकांना मोठा फायदा होणार आहे. प्राथमिक उपचार, आरोग्यतपासणी तसेच विविध आरोग्यविषयक सेवा स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार असल्याने नागरिकांची मोठी सोय होणार आहे.


# बडनेऱ्यात अवैध सावकारांवर चार पथकांकडून एकाचवेळी धाडी!

## ४३ संशयास्पद दस्तऐवज जप्त; कागदपत्रांची कसून तपासणी सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१बडनेरा** बडनेरा येथील अवैध सावकारीविरोधात उपनिबंधक, सहकारी संस्था विभागाने गुरुवारी सकाळी धडक कारवाई केली. चार पथकांनी एकाचवेळी विविध ठिकाणी धाडी टाकून ४३ संशयास्पद दस्तऐवज जप्त केले. या कारवाईमुळे अवैध सावकारांमध्ये खळबळ उडाली आहे.

जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था राजेश भुयार यांच्याकडे बडनेरा येथील काही अवैध सावकारांविरोधात तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यानुसार सहायक निबंधक प्रीती धामणे, दिपक गासे, चेतना कुचे, अमोल लोमटे तसेच पथकप्रमुख किशोर इंगळे आणि सहाय्यक निबंधक सचिन पतंगे यांच्या पथकांनी बडनेरा पोलिसांच्या सहकार्याने कारवाई केली. सुभाष चौकातील एका महिलेच्या घरी झडती घेतली असता ३४ संशयास्पद दस्तऐवज



आढळले. त्यामध्ये स्थावर मालमत्ता कागदपत्रे, इसारचिठ्ठी, खरेदीखत, कोरे स्टॅम्प आदींचा समावेश आहे.नवी वस्ती येथील कन्हैयालाल शर्मा यांच्या घरी ९ संशयास्पद दस्तऐवज, त्यात शेतकऱ्यांचे ७/१२ उतारे व इसारचिठ्ठया आढळून आल्या.

कन्हैयालाल शर्मा, मनोहरलाल शर्मा व आशिष शर्मा यांच्या सुभाष चौकातील घरासह धानोरा जोग रस्त्यावरील फार्महाऊसचीही झडती घेण्यात आली; मात्र तेथे संशयास्पद दस्तऐवज आढळले नाहीत. जात कागदपत्रांची चौकशी सुरू असून दोष आढळल्यास संबंधितांविरुद्ध फौजदारी कारवाई करण्यात येणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

## राज्यात मान्सूनची विश्रांती!:पुढील ४-५ दिवस अलर्ट नाही

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती –** महाराष्ट्रातील हवामानात पुन्हा एकदा मोठा बदल पाहायला मिळत आहे. गेल्या काही दिवसांपासून राज्याला झोडपून काढणाऱ्या पावसाचा जोर आता ओसरला असून, पुढील चार ते पाच दिवस राज्यातील कोणत्याही जिल्ह्याला जोरदार पावसाचा इशारा देण्यात आलेला नाही. सर्वसामान्यांना मुसळधार पावसापासून दिलासा मिळाला असला, तरी ऐन मोक्याच्या वेळी पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत मात्र भर पडली आहे.

**पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भात उष्णता वाढली–** पुणे, सातारा, कोल्हापूर, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांतही पावसाने पूर्णपणे विश्रांती घेतली आहे. घाटमाथ्यावरही पावसाचा जोर ओसरला आहे. विदर्भातील हवामानात तर मोठे बदल जाणवत असून, गेल्या दोन-तीन दिवसांपासून पाऊस थांबल्याने विदर्भातील हवामान कोरडे, दमट आणि उष्ण वातावरण निर्माण झाले आहे.

# समृद्धी महामार्गावर ट्रक चालकांची रेस
## ओव्हरटेकच्या नादात प्रवाशांना नाहक त्रास

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२१ अमरावती** १समृद्धी महामार्गावर भरधाव वेगाने धावणाऱ्या ट्रक चालकांच्या बेजबाबदारपणाचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. वर्ध्याजवळ तीन ट्रक चालकांनी चक्क एकमेकांमध्ये रेस लावल्याचे दिसून आले. एकमेकांना ओव्हरटेक करण्याच्या नादात ट्रक चालकांनी महामार्गावरील इतर वाहनांना पुढे जाण्यासाठी पुरेशी जागा न दिल्याने काही काळ वाहतुकीला अडथळा निर्माण झाला. या प्रकारामुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.मिळालेल्या माहितीनुसार, समृद्धी महामार्गावर तीन ट्रक भरधाव वेगाने एकाच दिशेने जात होते. यावेळी एका ट्रकला दुसऱ्या ट्रकने ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर तिसऱ्या ट्रकनेही वेग वाढवत पुढे जाण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे काही काळ तिन्ही ट्रक एकमेकांमध्ये स्पर्धा करीत असल्याचे चित्र निर्माण झाले. विशेष म्हणजे, ओव्हरटेक करताना इतर वाहनांना जाण्यासाठी आवश्यक अंतर न ठेवल्याने मागून येणाऱ्या वाहनचालकांची मोठी कोंडी झाली.समृद्धी महामार्गावर वाहनांना वेगाची मर्यादा असतानाही काही जड वाहनचालकांकडून नियमांचे सर्रास उल्लंघन केले जात



असल्याचा आरोप प्रवाशांकडून होत आहे. ट्रकसारख्या अवजड वाहनांनी भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणे वाहन चालवल्यास अपघाताची शक्यता अधिक असते. अशा परिस्थितीत एखाद्या वाहनाचा ताबा सुटल्यास मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.या प्रकारामुळे महामार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. जड वाहनचालकांकडून नियमांचे उल्लंघन होत असल्यास संबंधित यंत्रणेने कठोर कारवाई करण्याची गरज आहे. महामार्ग प्रशासन आणि वाहतूक पोलिसांनी या घटनेची दखल घेऊन संबंधित ट्रक चालकांची ओळख पटवून त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे.समृद्धी महामार्गावर अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी सीसीटीव्ही आणि इतर यंत्रणांच्या माध्यमातून वाहनांवर लक्ष ठेवून नियम तोडणाऱ्या चालकांवर तत्काळ दंडात्मक कारवाई करण्याची मागणीही जोर धरत आहे.

# 'महा वॉकेथॉन'मध्ये युवकांचा उत्साहात सहभाग
## ७१ हजार रूपयांच्या बक्षीसाचे लकी ड्रॉद्वारे वितरण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१ अमरावती–** नागरिकांमध्ये जलसंधारणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी आज शहरात 'महा वॉकेथॉन : 'वॉक फॉर वॉटर' उपक्रम पार पडला. सकाळी शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या मैदानावर एकत्र येत युवकांनी वॉकेथॉनमध्ये उत्साहात सहभाग घेतला. यावेळी लकी ड्रॉद्वारे दहा सहभागींना पारितोषिके देण्यात आली.



जलसंवर्धन, पाणी बचत आणि पर्यावरण संरक्षणाचा संदेश वॉकेथॉनमधून देण्यात आला. या वॉकेथॉनला श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयापासून सुरुवात झाली. विभागीय आयुक्त नयना गुंडे, शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हषवर्धन देशमुख यांनी वॉकेथॉनला हिरवी झेंडी दाखवून सुरवात केली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, अधिक्षक अभियंता दिलीप निपाने, उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर घ्यार, श्री. पाटील, जलसंधारणाचे कार्यकारी अभियंता सुनील जाधव, श्रीकांत उमप, सोनाली काकडे, मुख्याधिकारी विकास खंडारे, शिवाजी शारिरीक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य गावंडे आदी उपस्थित होते. सुरवातीला विभागीय आयुक्त श्रीमती गुंडे यांच्या हस्ते जलपुजन करण्यात आली. तसेच उपस्थितांना जलसंधारणाची शपथ देण्यात आली. पंचवटी चौक, गर्ल्स हायस्कूल चौक, जिल्हा कोषागार कार्यालय आणि सिंचन भवन या मार्गे वॉकेथॉन शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या मैदानावर पाहोचली. याठिकाणी वॉकेथॉनचा समारोप करण्यात आला, तसेच वॉकेथॉनमध्ये सहभागींना पारितोषिके वितरीत करण्यात आली. यात प्रथम तनुजा मेश्राम, द्वितीय कस्तुरी बहुरूपी, तृतीय आयुष मुंढे, तर राजू मुंढे, अंजू कासदेकर, आचल वानखडे, विंजोथ केनॉय, खुशी नवखार, प्रचिती पाटील, अविनाश साऊरकर यांना उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आली.या उपक्रमात प्रा. राम मेघे अभियांत्रिकी महाविद्यालय, हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, यांच्यासह विविध शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी, अधिकारी, कर्मचारी यांनी सहभाग नोंदविला. यावेळी सहभागींसाठी महावॉकेथॉन झुंबाचे आयोजन करण्यात आले.–

# महर्षी पब्लिक स्कूलच्या हलगर्जीपणावर
## अपर आदिवासी आयुक्तांचा ठपका
### ५४५ विद्यार्थ्यांचे इतर शाळांत समायोजन सुरू



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती–** महर्षी पब्लिक स्कूलमध्ये १५ ऑगस्ट रोजी देण्यात आलेल्या जेवणातून विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याच्या घटनेनंतर आदिवासी विद्यार्थी राजेश बेठेकर याच्या मृत्यूचे प्रकरण चांगलेच गंभीर बनले आहे. या प्रकरणात महर्षी पब्लिक स्कूल प्रशासनाने हलगर्जीपणा केल्याचा ठपका अपर आदिवासी आयुक्त संदीप गोलाईत यांनी ठेवला आहे. शाळेला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून, शाळेची मान्यता रद्द करण्याची शक्यताही निर्माण झाली आहे.विषबाधेनंतर राजेश बेठेकर या आदिवासी विद्यार्थ्याचा मृत्यू झाला, तर अन्य पाच विद्यार्थ्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. या घटनेमुळे आदिवासी समाजात तीव्र संतापाची लाट निर्माण झाली असून, विविध आदिवासी संघटनांनी शाळा प्रशासनाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. महर्षी पब्लिक स्कूलची मान्यता तातडीने रद्द करण्यात यावी, अशी मागणी सर्व स्तरांतून केली जात आहे.दरम्यान, शाळेतील ५४५ विद्यार्थ्यांचे इतर शाळांमध्ये समायोजन करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी प्रशासनाकडून पर्यायी व्यवस्था करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करताना शाळा प्रशासनाच्या कार्यपद्धतीतील अनेक बाबी समोर आल्याचे अपर आदिवासीआयुक्तांनी स्पष्ट केले आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत आवश्यक ती खबरदारी न घेतल्याचा आरोप शाळेवर करण्यात आला आहे. त्यामुळे आता कारणे दाखवा नोटीसला शाळा प्रशासन काय उत्तर देते आणि त्यानंतर प्रशासन कोणती कारवाई करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.राजेश बेठेकरच्या मृत्यूला जबाबदार असणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणीही आदिवासी संघटनांकडून करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आल्याने महर्षी पब्लिक स्कूलची मान्यता कायम राहणार की रद्द होणार, याबाबतची उत्सुकता वाढली आहे.

# कुळ कायद्याखाली देवस्थानची जमीन लाटण्याचा डाव उधळला

**विदर्भ प्रजासत्ताक दि२१अचलपूर –** मौजा काकडा येथील श्री मारोती संस्थान (श्री राम व हनुमान मंदिर) यांच्या मालकीची शेतजमीन कुळ कायद्यांतर्गत खरेदी करण्याचा प्रयत्न अखेर फेटाळण्यात आला. महाराष्ट्र मंदिर महासंघ आणि संस्थानच्या विश्वस्तांनी केलेल्या कायदेशीर पाठपुराव्यानंतर अचलपूरचे तहसीलदार सुदर्शन शहारे यांनी ३० जुलै २०२६ रोजी अर्ज खारीज करून देवस्थानच्या बाजूने निकाल दिला.

काकडा येथील शेत गट क्रमांक १२६ ही जमीन कुळ कायद्यांतर्गत खरेदी करून मिळावी, यासाठी



पंजाबराव महादेवराव पाटील व इतरांनी तहसीलदारांकडे अर्ज दाखल केला होता. या अर्जाला संस्थानचे विश्वस्त आणि महाराष्ट्र मंदिर महासंघाने आक्षेप घेतला. महासंघाच्या वतीने अनुप जयस्वाल, मयुर दीक्षित आणि सुरेंद्र प्रजापती यांनी प्रशासनासमोर भक्कम बाजू मांडली.

सदर जमिनीचे कुळ खरेदी प्रकरण यापूर्वीच ३० नोव्हेंबर १९६६ रोजी रद्द झाले असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. दोन्ही बाजूंचे पुरावे व साक्ष तपासल्यानंतर तहसीलदारांनी यापूर्वीचा आदेश रद्द झाल्याचा कोणताही पुरावा उपलब्ध नसल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे अर्जदारांना जमीन खरेदीचा हक्क प्राप्त होत नसल्याचा निष्कर्ष नोंदवत अर्ज फेटाळण्यात आला. या निर्णयामुळे भाविकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

# अमरावती-मुंबई विमानसेवेचे वेळापत्रक पुन्हा बदलले
## २५ ऑगस्टपासून आठवड्यातून चारच दिवस उड्डाण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१ अमरावती–** अमरावतीच्या बेलोरा विमानतळावरून मुंबईसाठी सुरू असलेल्या विमानसेवेच्या वेळापत्रकात पुन्हा एकदा मोठा बदल करण्यात आला आहे. २५ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत आता आठवड्यातून केवळ चार दिवसच अमरावती–मुंबई विमान उड्डाण करणार असल्याची अधिकृत घोषणा महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक दीपक कपूर यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सद्वारे केली आहे. एअरलाइन्सच्या अंतर्गत तांत्रिक कारणांमुळे हा बदल करण्यात आला असून, आता सोमवार, बुधवार, शुक्रवार आणि रविवार या चार दिवशीच विमानसेवा उपलब्ध असेल.अमरावती आणि परिसरातून मुंबईसाठी विमान प्रवाशांची संख्या सातत्याने भरपूर आणि समाधानकारक राहिली आहे. बेलोरा विमानतळावरून मिळणारा महसूल आणि प्रवाशांचा



प्रचंड प्रतिसाद उत्तम असतानाही केवळ विमान कंपनीच्या तांत्रिक कारणांमुळे सेवा मर्यादित करावी लागत असल्याचे दीपक कपूर यांनी आपल्या ट्विटमध्ये स्पष्ट केले आहे.

आता पुन्हा कपातअमरावती ते मुंबई दरम्यान १६ एप्रिल २०२५ ते एप्रिल २०२६ या एका वर्षाच्या कालावधीत 'अलायन्स एअरलाइन्स' कंपनीमार्फत आठवड्यातून चार दिवस विमानसेवा दिली जात होती. प्रवाशांचा वाढता प्रतिसाद पाहता, मे २०२६ नंतर या विमानसेवेचे दिवस वाढवून ती आठवड्यातून ५ दिवस करण्यात आली होती. मात्र, आता कंपनीला भेडसावणाऱ्या काही तांत्रिक अडचणींमुळे २५ ऑगस्टपासून या विमान उड्डाणांच्या संख्येत पुन्हा कपात करण्यात आली आहे.

# न्यायव्यवस्थेबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य
## नितेश कराळेंविरोधात गुन्हा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१वर्धा–** भारतीय न्यायव्यवस्थेबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य असलेला व्हिडीओ समाजमाध्यमावर प्रसारित केल्याच्या आरोपावरून नितेश कराळे यांच्याविरोधात वर्धा शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांच्या गोपनीय शाखेतील कर्मचाऱ्याने समाजमाध्यमावरील निरीक्षणादरम्यान हा व्हिडीओ पाहिल्यानंतर तक्रार केली. या व्हिडीओमुळे युवक आणि समाजातील तरुणांमध्ये न्यायव्यवस्थेबद्दल गैरसमज व अविश्वास निर्माण होऊन अशांतता निर्माण होण्याची शक्यता असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. त्यांच्या समाजमाध्यम खात्यावर भारतीय न्यायव्यवस्थेबद्दल टीका करणारा आणि आक्षेपार्ह स्वरूपाचा



व्हिडीओ प्रसारित केल्याचा आरोप आहे. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, या वक्तव्यांमुळे न्यायव्यवस्थेबद्दल समाजात गैरसमज निर्माण होण्याची शक्यता आहे. वर्धा शहर पोलीस ठाण्यातील गोपनीय शाखेत कार्यरत पोलीस हवालदार प्रदीप नागोराव सहकाटे हे समाजमाध्यम निरीक्षणाचे काम करीत असताना १६ ऑगस्ट रोजी त्यांना हा व्हिडीओ आढळला. व्हिडीओ पूर्ण पाहिल्यानंतर त्यांनी वरिष्ठांच्या निदर्शनास ही बाब आणून दिली .

तक्रारीनुसार, व्हिडीओमध्ये भारतीय न्यायव्यवस्थेबद्दल टीका करताना आक्षेपार्ह शब्दांचा वापर करण्यात आला आहे. न्यायपालिका आपल्या अपेक्षित मर्यादेपलीकडे जात असल्याचा आशय असलेले वक्तव्यही करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. मात्र, वक्तव्याचा संपूर्ण संदर्भ आणि त्यामागील भूमिका तपासातून स्पष्ट होणार आहे.दाखल केली. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला आहे. संबंधित व्हिडीओ, त्यातील वक्तव्ये आणि समाजमाध्यमावरील त्याचा प्रसार याबाबत तपास करण्यात येणार आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक नागेश कैलास चाटरकर यांच्याकडे देण्यात आल्याची नोंद प्रथम माहिती अहवालात आहे.

# गॅस, दूध, साखर अन् आलेही महाग; चहाच्या घोटासाठी खिशाला चटका
### टपरीवरील गर्दी झाली कमी साखर पोहोचली ५२ रुपये किलोवर, बजेटवर परिणाम

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती** वाढत्या महागाईच्या आगीत आता सर्वसामान्यांचा रोजचा चहाही होरपळून निघाला आहे. गॅस सिलिंडर, दूध आणि साखरेचे भाव आधीच गगनाला भिडलेले असताना, आता आल्याच्या (आले) दरानेही सेंच्युरी पार केली आहे. परिणामी, टपरीवरील १० रुपयांचा चहा १२ रुपयांवर पोहोचला असून, पावसाळ्यात वाफाळत्या चहाची सरकन चुस्की घेणे सामान्यांच्या खिशाला परवडेनासे झाले आहे. एरवी चहाच्या टपरीवर असणारी गर्दी आता कमी झाल्याचे दिसून येत आहे.अनेक ठिकाणी चहाच्या कपाचा आकार घटला

चहाचे दर थेट वाढवले तर ग्राहक कमी होतील, या भीतीने अनेक टपरीधारक आणि हॉटेलचालकांनी नामी युक्ती शोधली आहे. त्यांनी चहाचे दर



स्थिर ठेवले असले, तरी कपचा आकार मात्र लहान केला आहे. त्यामुळे कमी चहा मिळूनही ग्राहकांना पूर्ण पैसे मोजावे लागत आहेतत. पूर्वी ५ रुपयांना एक कप चहा मिळत होता. त्यावेळी चहाही कप भरून मिळत होता. त्यानंतर ७रुपये दर झाला व आता एक कप चहासाठी १० रुपये तर काही ठिकाणी १५ रुपये मोजावे लागत आहेत. पावसाळ्याच्या दिवसांत रिमझिम पावसात गरमागरम आणि आले घातलेला वाफाळता चहा पिणे हा सर्वसामान्यांच्या आवडीचा दिनक्रम असतो. मात्र, सर्वच जिन्नस महागल्यामुळे चहाच्या एका घोटाचा आनंद आता महागाईच्या झळांमुळे फिका पडू लागला आहे.

दूध व साखरेचे दर परवडेनासे झाल्यामुळे काही ठिकाणी भेसळयुक्त दूध किंवा कृत्रिम गोडीचा वापर होण्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाकडून गुणवत्ता तपासणी आणि दंडात्मक कारवाईची भीती चहाविक्रेत्यांना सतावत आहे.

# आता लग्न, यात्रांसाठीही एसटी महाग; प्रति किमी. ११ रुपये वाढ !रद्द शुल्क व अनामत रकमेतही वाढ : खासगी कार्यक्रमांच्या बुकिंग दरात केला मोठा फेरबदल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती** सर्वसामान्यांची वाहिनी मानल्या जाणाऱ्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) नियमित प्रवाशांच्या भाडेवाढीनंतर आता लग्नसमारंभ, पर्यटन, धार्मिक यात्रा व विविध खासगी कार्यक्रमांसाठी आरक्षित केल्या जाणाऱ्या विशेष बससेवेच्या दरातही मोठी वाढ केली आहे. नव्या दरवाढीनुसार आता प्रासंगिक करारावर दिली जाणारी एसटी बस तब्बल ११ रुपये प्रतिकिलोमीटरने महागली आहे.आधी प्रासंगिक करारासाठी प्रतिकिलोमीटर ६४ रुपये आकारले जात होते. मात्र, सुधारित नियमावलीनुसार हा दर आता ७५ रुपये प्रतिकिलोमीटर करण्यात आला आहे.

एसटी प्रशासनाने घेतलेल्या या निर्णयामुळे सर्वसामान्य नागरिकांना, तसेच लग्नकार्य व धार्मिक यात्रांचे आयोजन



करणाऱ्या आयोजकांना मोठा आर्थिक फटका बसणार आहे.

खासगी वाहनांच्या तुलनेत बुकींग केलेल्या एसटीचा खर्च अधिक असतो. मात्र, सुरक्षित प्रवास म्हणून तसेच लांब पल्ल्यावर वऱ्हाड न्यायचे असल्यास प्रामुख्याने एसटीला प्राधान्य दिले जाते. मात्र, डिझेल व इतर खर्चात वाढ झाली असल्याचे कारण पूढे करून एसटीने बुकिंगच्या दरात वाढ केली आहे.

### शैक्षणिक सहलींसाठी ५० टक्के सवलत कायम

प्रासंगिक करारात मोठी दरवाढ झाली असली तरी शाळा, महाविद्यालये व शैक्षणिक संस्थांच्या सहलींसाठी एसटी महामंडळाने मोठा दिलासा दिला आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सहलींसाठी मिळणारी ५० टक्के सवलत पूर्ववतकायम ठेवण्यात आली आहे.जानेवारी, फेब्रुवारी या कालावधीत सहलीसाठी मोठ्या प्रमाणात बसेसची मागणी होते. विद्यार्थी हित लक्षात घेऊन भाड्यात वाढ केली नाही.

### खासगी कार्यक्रमांसाठीही बुक करता येते बस

लग्नाची वऱ्हाडे, धार्मिक यात्रा, शैक्षणिक सहली, राजकीय सभा, पर्यटन तसेच कौटुंबिक व खासगी कार्यक्रमांसाठी नागरिक एसटी महामंडळाची बस आरक्षित करतात. खासगी ट्रॅव्हल्सच्या तुलनेत सुरक्षित, विश्वासू आणि वेळेवर मिळणारा पर्याय म्हणून ग्रामीण व शहरी भागात एसटीलाच पहिली पसंती दिली जाते.


सांध्य मराठी दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
अमरावती येथून प्रकाशित
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
धन्यवाद वाचकांनो!
25 लाख वाचकांनी
आमच्या साईड ला भेट दिल्याबद्दल
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
मुख्य पृष्ठ अमरावती विदर्भ महाराष्ट्र देश-विदेश
ब्रेकिंग न्यूज
अमरावतीत विकासकामांचा धडाका
पावसाचा जोर वादला
शेतकऱ्यांसाठी महत्वाची बातमी
राज्यातील राजकीय घडामोडी
क्रीडा क्षेत्रातील ताज्या बातम्या
HTTPS://E PAPER.VIDARBHAPRAJASATTAK.COM
आपल्या परिसरातील बातम्या व राज्यभरातील ताज्या घडामोडी
वाचा आता आमच्या सोबत
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
आमच्या चॅनल ला आजच जॉईन व्हा!
स्थानिक बातम्यांवर विशेष भर
राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व कृषी बातम्या
फोटो व व्हिडिओ सह अपडेट
तत्काळ व विश्वसनीय बातम्या
मो. 8605948853
Follow Us On :